All PDF Collection
PDF Seva

# जाहिरात लेखन कसे करावे ?

आजच्या स्पर्धात्मक युगात जाहिरात ही एक महत्त्वाची सृजनशील कला आहे. उत्पादक आणि ग्राहक यांना जोडणारा तो एक मुख्य दुवा आहे. शालेय स्तरावर (विशेषतः इयत्ता ९ वी आणि १० वी साठी) जाहिरात लेखनाला विशेष महत्त्व असून ते एक उपयोजित लेखनाचा भाग आहे.

(१) जाहिरात तयार करताना मथळा, उपमथळा तयार करावा. त्यासाठी सुभाषिते सुवचने, सुप्रसिद्ध कवितेतल्या वा गाण्यातल्या ओळी, काव्यमयतेचा आभास निर्माण करणाऱ्या ओळी. लोकांमध्ये विशेष लोकप्रिय असलेले शब्दप्रयोग इत्यादींचा उपयोग करावा.

(२) जाहिरातीचा सुरुवातीला लक्ष वेधून घेणारे शब्द वापरावेत जसे खुशखबर, धमाकेदार सेल, एकावर एक फ्री, आधी या आधी मिळवा, 70% सूट अशाप्रकारे

(३) जाहिरात कशाची आहे हे ठळकपणे व आकर्षक रीतीने मांडलेले असावे.

(४) आलंकारिक, काव्यमय प्रभावी शब्दरचनेचा वापर करावा. जाहिरातीची भाषा साधी, सोपी, पण वेधक असावी. व्यवहारातील भाषा वापरली तरी चालेल.

(५) ग्राहकांची सातत्याने बदलणारी आवड, सवयी, फॅशन्स व गरज यांचे प्रतिबिंब जाहिरातीत दिसायला हवे. तसेच,

(६) जाहिरात नेहमी कमीत कमी शब्दांत असावी.

(७) जाहिरातीला चित्रांची जोड देता आल्यास जाहिरात अधिक प्रभावी होते, हे खरे. मात्र जाहिरातलेखनात चित्रे काढणे किंवा चित्रकलात्मक सजावट करणे अनिवार्य नाही.

(८) जाहिरातीचे भाषिक रूप महत्त्वाचे. साध्या चौकटीमध्ये योग्य ओळींत केलेली मांडणीही पुरेशी.

(९) जाहिरातीत संपर्क स्थळाचा पत्ता, संपर्क क्रमांक (मोबाइल नंबर, इ-मेल आयडी) यांचा स्पष्ट उल्लेख करावा.

Visit Website : https://www.PDFSeva.Net

## प्लास्टिक हटवा – पर्यावरण वाचवा

विविध प्रकारच्या, विविध आकारांच्या

# कागदी पिशव्या

आमच्याकडे मिळतील.

विविध प्रसंगांसाठी डिझायनर कागदी पिशव्यादेखील

आमच्याकडे मिळतील.

आम्ही ऑर्डरप्रमाणे कागदी पिशव्या बनवून देतो.

**फक्त एक फोन करा –**

**हव्या तशा पिशव्या घरपोच मिळवा**

आपला नंबर कळवा. व्हॉट्सॲपवर सँपल्स पाहा.

**: संपर्क :**

पिशवीवाले : ०९७xxxxxxxx

---

## आठवण पोळीभाजी केंद्र

- तुमचं पोट सतत बिघडत ?
  - तुम्हांला चांगलं जेवन मिळत नसणार !
- दिवसभर अशक्तपणा व थकवा जाणवतो ?
  - तुम्हांला चांगलं जेवन मिळत नसणार !
- दिवसभर उत्साह वाटत नाही?
  - तुम्हांला चांगलं जेवन मिळत नसणार !

***चांगल्या जेवनासाठी***

***आठवण पोळीभाजी केंद्राला अवश्य भेट दया***

- स्वच्छतेचे काटेकोर पालन
- उत्तम दर्जाच्या धान्याचा वापर
- रास्त भाव

*एकदम झकास*

*तुमच्या आरोग्याची सर्वांगीण काळजी घेणारे*

**आठवण पोळीभाजी केंद्र**

एकदा चव घेऊन तर बघा !

***स्थळ: मराठी शाळेजवळ ,राजूर***

संपर्क: xxxx882668

अधिक माहितीसाठी : www.athvanpolibhaji.com

Visit Website : https://www.PDFSeva.Net

## सुवर्णसंधी ! सुवर्णसंधी !! सुवर्णसंधी !!!

**'नेचर क्लब'** आयोजित

शालेय विद्यार्थ्यांसाठी

नि:शुल्क प्रवेश

मर्यादित ५० विद्यार्थ्यांसाठी

# पक्षी निरीक्षण सहल

रविवार, दि. १४ फेब्रुवारी २०१६

**ठिकाण** : पळसदेव (उजनी जलाशय परिसर)

**संपर्क** : नेचर क्लब, सोमवार पेठ.

**टिप** : सहभागी विद्यार्थ्यांनी एक वेळचा डबा, पाण्याची बाटली, टोपी, सॉक्स् व शूज, डायरी व पेन, इच्छेनुसार कॅमेरा सोबत आणावे.

---

# गारेगार

## आईस्क्रीम पार्लर

वेळ सकाळी १० ते रात्री १०

**उन्हाची काहिली सहन होईना ???**

**मग गारेगार आईस्क्रीम चाखा ना!!!**

चॉकलेट, स्ट्रॉबेरी, मँगो, पाइनॅपल विविध फ्लेवर्सची थंडगार मेजवानी

बच्चे कंपनीसाठी खास सूट

आजी, आजोबा, आई, बाबा, चिंकू, पिंकू, जुई, राधिका

**फॅमिली पॅक सोबत लकी ड्रॉ**

'सगळ्याचं हक्काचं द्वार' 'गारेगार'

**पत्ता** : गारेगार आईस्क्रीम पार्लर, शीतल कंपाऊंड, नागपूर.

Visit Website : https://www.PDFSeva.Net

## जाहिरात लेखन करताना लक्षात घ्यायच्या महत्त्वाच्या गोष्टी:

१. **मथळा आणि उपमथळा (Headline):** जाहिरातीचा मथळा आकर्षक असावा. यासाठी सुभाषिते, सुवचने, प्रसिद्ध कविता किंवा गाण्याच्या ओळींचा वापर करावा. यामुळे वाचकांचे लक्ष लगेच वेधले जाते.

२. **आकर्षक शब्दांचा वापर:** जाहिरातीची सुरुवात करताना 'खुशखबर', 'धमाकेदार सेल', 'एकावर एक फ्री', 'मर्यादित स्टॉक' किंवा '७०% पर्यंत सूट' यांसारख्या शब्दांचा वापर करावा.

३. **भाषेचे स्वरूप:**

- भाषा साधी, सोपी पण वेधक असावी.
- अलंकारिक आणि काव्यमय भाषेचा वापर केल्यास जाहिरात अधिक प्रभावी ठरते.
- कमीतकमी शब्दांत जास्तीत जास्त आशय मांडला पाहिजे.

४. **जाहिरातीची मांडणी (Layout):**

- जाहिरात कशाची आहे, हे ठळकपणे मांडलेले असावे.
- एका साध्या चौकटीत योग्य ओळीत केलेली मांडणी पुरेशी असते.
- चित्रे काढणे अनिवार्य नाही, परंतु चित्रांची जोड दिल्यास जाहिरात अधिक सुंदर दिसते.

५. **संपर्क तपशील:** जाहिरातीच्या शेवटी संपर्क स्थळाचा पत्ता, मोबाईल नंबर आणि ईमेल आयडी यांचा स्पष्ट उल्लेख असणे अत्यंत आवश्यक आहे.

६. **ग्राहकांच्या गरजांचे प्रतिबिंब:** ग्राहकांच्या बदलत्या आवडीनिवडी, फॅशन आणि गरजा यांचे प्रतिबिंब जाहिरातीत दिसावे.

---

## परीक्षेसाठी गुणदान आराखडा (५ गुण):

- **लक्षवेधी शब्दरचना:** १ गुण
- **आराखडा व मांडणी:** २ गुण
- **आलंकारिक भाषाशैली:** १ गुण
- **समर्पक शब्दांचा उल्लेख:** २ गुण *(टीप: एकूण गुण ५ असले तरी विभागणी विषयानुसार बदलू शकते.)*